1

आदेश

क्रमांक/यजिप/शिवि/पेंशन-१/वशि/२१६२/२०१७
यवतमाळ जिल्हा परिषद यवतमळ
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
दिनांक- 9/8/96

संदर्भ- १.शिक्षण व सेवायोजन विभाग मंत्रालय मुंबई क्रमांक/एमएसबी/१०८९/४७७८/प्राशि-३/दि.१५/१/१९९०
२.शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रलय मुंबई यांचे शासन क्रमांक/पीआरई/२००२/३३०२/प्राशि-१/दि.१५/११/२००६
३.शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई शासन शुध्दीपत्क क्रमांक/पीआर-२००२/३३०२/ड-५०२/५२९२ दि.२७/९/२०१३

शासन निर्णय दिनांक १५/१/१९९० नुसार प्राथमिक निवडश्रेणी मंजुर करण्यासाठी गठीत केलेल्या समितीची दिनांक १/०८/२०१७ रोजी बैठक घेण्यात आली.

सदर बैठकीमध्ये शासन निर्णय दिनांक २०/७/२००४ अन्वये ज्या प्राथमिक शिक्षकांची २४ वर्षे सलग सेवा झालेली आहे. त्यांना निवडरेणी लागु करण्याबाबत शासन निर्णयांत विहित केलेल्या निकषानुसार निवडश्रेणी लागु करण्याकरिता जिल्हा परिषद या संस्थेतील प्राथमिक शिक्षक या संवर्गातील वरिष्ठश्रेणीतील २० टक्के पदांना सोबतचया विवरणपत्रातील ६१७ सेवानिवृत्त शिक्षकांना निवडश्रेणी लागु करण्यात येत आहे.

वरिष्ठ वेतनश्रेणीतील २० टक्के पदांना सेवा जेष्ठतेनुसार निवडश्रेणी लागु रिता असतांना शासन शुध्दीपत्क दिनांक १५/११/२००६ मध्ये दिलेल्या सुचनेनुसार वरिष्ठ वेतन श्रेणीत वेतन घेणा-या व ज्यांनी दिनांक १/१/१९८६ रोजी व त्यापुढे सलग सेवा २३ वर्षे अर्हताकारी सेवा पुर्ण केलेली आहे. अशा प्राथमिक शिक्षकांना व दिनांक १/१/१९८६ रोजी त्यांची सलग सेवा १८ वर्षे किंवा १८ वर्षापेक्षा जास्त झालेली असल्यामुळे अशा प्राथमिक शिक्षकांना निवडश्रेणीकरिता विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता मिळयापासुनची सुट देण्यात येत आहे. तसेच ज्या प्राथमिक शिक्षकांना दिनांक १/४/२००४ रोजी वयाची ५५ वर्षे पुर्ण केलेली आहे. अशा प्राथमिक शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षणातुन सुट प्रदान करण्यात येत आहे.

निवडश्रेणी मान्य करण्यासाठी दिनांक ३१/१२/१९९२ पूर्वी ज्या शिक्षकांची सलग सेवा २४ वर्षे झालेजह आहे. अशा सर्व प्राथमिक शिक्षकांचा विचार करुन अटीपासुन सुट मिळालेल्या प्राथमिक शिक्षकांना सोबत जोडलेल्या विवरणपत्रत दर्शविल्यानुसार खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन निवडश्रेणी मंजुर करण्यात येत आहे.

अटी व शर्ती

१ निवडश्रेणीच्या वेतननिश्चितीस अर्थ विभागाची मान्यता घेण्यात यावी.

२ प्राथमिक शिक्षकांना निवडश्रेणी ी दिनांक १/१/१९८६ पासुन देय ठरविण्यात येत असली तरी निवडश्रेणी प्रत्यक्ष आर्थिक लाभ या शिक्षकांना १/४/२००४ पासुन देय होईल.

३ दिनांक १/१/१९८६ वा त्यानंतर निवडश्रेणीसाठी पाः ठरत असलेल्या शिक्षकास ज्यावेळी वरिष्ठश्रेणी अनुज्ञेय ठरली असेल त्या दिनांकापासुन तो शिक्षक वरिष्ठश्रेणीत जे वेतन घेत असेल तो टप्पा निवडश्रेणीमधील वेतन श्रेणीमध्ये असल्यास त्या टप्प्यावर नसल्यास लगतच्या खालच्या टप्प्यावर त्याचे वेतन निश्चित करण्यात यावे.

४ निवडश्रेणी अनुज्ञेय ठरेल त्या दिनांकापासुन दिनांक १ एप्रिल २००४ पर्यंत निवडश्रेणी मध्ये काल्पनिकरित्या वेतन निश्चिती करण्यात यावी.

५ दिनांक १/१/१९८६ किंवा त्यानंतर दिनांक ३१ मार्च २००४ पर्यतच्या कालावधीची कोणतीही थकबाकी या शिक्षकांना देण्यात येणार नाही.

६ निवडश्रेणी प्राप्त करण्यासाठी पाः ठरल्यानंतर संबंधित शिक्षकांनी वेतननिश्चितीबतचा आपला विकल्प १ महिन्याच्या आत देणे आवश्यक राहील.

यासाठी होणा-या अतिरिक्त खर्चाची अर्थसंकल्पीय अंदाजपत्काात तरतुद करु सदर तरतुद उपलब्ध झाल्यानंतर थकबाकीची रक्कम व निवडश्रेणीस पाः शिक्षकांचे वाढीव वेतन अदा करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

(मा.मु.का.अ.यांचेकडुन मुळ प्रत अनुमोदित.)

शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद यवतमाळ.करिता

प्रतिलीपी-

1.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ यांचेकडे माहितीकरिता सादर.कृपया सदर्हु माहिती आपले संकेतस्तळावरुन प्रसिध्द करण्यात यावी ही विनंती.

2.मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेकडे माहितीकरिता सादर.

3.गट विकास अधिकारी पंचायत समिती--------------------यांचेकडे माहितीकरिता रवाना.

4.गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती------------------ यांचेकडे माहितीकरिता रवाना.